# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. सर्वसाधारण सभा**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र. ०८**

**दि.१३/०५/२०२६**

प्रति,

मा.श्री /श्रीमती ..............................................................,

नगरसेवक / नगरसेविका,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.२२/०५/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका**

१. मागील दि.२३/०४/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.
२. प्रश्नोत्तरे.
३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.
४. श्री. रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.
५. श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांच्या स्वेच्छा सेवानिवृतीबाबत.
६. श्री.वैभव प्रमोद जाधव यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत.
७. श्रीम.सुरेखा समीर पाटील यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत.
८. श्रीम.अनिता गणेश जाधव यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "शिपाई" या पदावर सामावून घेणेबाबत.
९. श्री.किशोर आलो पाटील व इतर २ (ठेका फायरमन) यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे (ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि.३०/०९/२०१५ रोजी दिलेला निर्णय व मा.उच्च न्यायालयच्या दि.१३/०२/२०२५ रोजीच्या निर्णयाच्या अनुषगांने समावेशन करण्याबाबत.
१०. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्वसमावेशक शहर वाहतूक आराखडा Comprehensive Mobility Plan (CMP) राबविण्याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
११. भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून, भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या तीन

आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिध्द करणेस, त्याकामी होणाऱ्या त्रैवार्षिक अंदाजित खर्चास प्रशासकीय तसेच जाहिर निवेदनाच्या अटी शर्तीस मान्यता मिळणेबाबत.

१२.वसई-विरार शहर महानगरपालिकेस कचरामुक्त शहर (Garbage Free City GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करणेकरिता मा.सर्वसाधारण सभेपुढे अंतिम प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१३.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जखमी जनावरांवर औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकिय दवाखाना उभारणेबाबत व याकामी होणाऱ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१४.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांना औषध उपचार करणेसाठी उभारण्यात आलेले २ श्वान निर्बीजीकरण केंद्रावरील कामकाजावर नियंत्रण ठेवणेकरिता आस्थापना विभागाचे मंजूर ठेकेदार मे.अर्चना सर्विसेस यांचेमार्फत कंत्राटी तत्वावर १ वेटरनरी डॉक्टराची नेमणूक करणेबाबत.

१५.वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वसई नवघर पूर्व येथे १००० श्वानांच्या क्षमतेचे निवारा केंद्र बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

१६.वसई विरार कार्यक्षेत्रातील दैनंदिन जमा होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत.

१७.मौजे भोयदापाडा, गोखिवरे येथील क्षेपणभूमीवर पडून राहिलेल्या कचऱ्यावर (Legacy waste Remediation) प्रक्रिया करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत.

१८.विनामोबदला वृक्ष छाटणी करणे तसेच छाटणी केलेला पालापाचोळा, लाकुड फाटा उचलणेचे काम मिळणेबाबत.

१९.वसई-विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता मिळणेबाबत.

२०.वसई विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता १ एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ तथा प्रलंबित देयके व माहे एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजित कार्यक्रमाकरीता सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता प्रशासकीय / वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२१.PPP (Public Private Partnership) तत्वावर शहरातील उद्यानाकरिता आरक्षित भूखंड, मोकळ्या जागा तसेच गुरचरण जागांवर मियावाकी पद्धतीने वृक्षलागवड व देखभाल करणे तसेच दुभाजकांमध्ये शोभिवंत झाडांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्वारस्य अभिरुची सूचना (EOI) अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांच्या आधारे कामाचे वाटप करण्याबाबत.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)